# <u>जाहीर नोटीस</u>

लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील **लिपिक-टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे, सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत नियमित उमेदवार प्राप्त होईपर्यंत कंत्राटी** स्वरुपात भरावयाची असून त्याकरीता इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) लोक आयुक्त कार्यालयातील **लिपिक-टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे** वर उल्लेखीलेल्या परिस्थितीत, सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत नियमित उमेदवार प्राप्त होईपर्यंत, कंत्राटी स्वरुपात भरण्यात येणार असून सदर पदास नियमित कर्मचाऱ्याचे कोणतेही लाभ अनुज्ञेय नाहीत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत नियमित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर कंत्राटी स्वरुपात केलेल्या नियुक्त्या आपोआपच संपुष्टात येतील.

२) कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना दरमहा **रु.३०,०००/-** इतके ठोक वेतन अनुज्ञेय असेल. **ठोक वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत**. गैरहजेरी / अनुपस्थिती कालावधीचे कोणतेही वेतन त्यांना अनुज्ञेय ठरणार नाही. निव्वळ कर्तव्य कालावधीचे वेतनच त्यांना अनुज्ञेय असेल. शिवाय त्यांना कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय ठरणार नाहीत.

३) संबंधित उमेदवाराने लिपिक टंकलेखक पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्ती मिळविण्यासाठी पुढील अर्हता धारण केलेली असली पाहिजे.

पात्रता:

१) उमेदवार भारतीय नागरीक असला पाहिजे.

२) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय नेमणूकीच्या वेळी १९ वर्षापेक्षा कमी परंतु, ३८ वर्षापेक्षा अधिक नसावे

३) शैक्षणिक अर्हता : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

४) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक.

५) उमेदवारांने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा (MS-CIT किंवा तत्सम) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

६) शैक्षणिक अर्हते सोबत आवश्यक असलेली टंकलेखन अर्हता:

अ) मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषीत केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे.

किंवा

आ) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोवर २०१३ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता-बेसिक कोर्स इन कॉम्पुटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट आणि बेसिक कोर्स इन कॉम्पुटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

४) इच्छूक उमेदवारांनी सोबतच्या जोडपत्र-अ मध्ये विहित केलेल्या नमून्यात त्यांचे अर्ज मा. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासन भवन, १ला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालया समोर, मुंबई-४०००३२ यांना उद्देशून **दि.३०/०१/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष किंवा रजि.ए.डी/ स्पीड पोस्टामार्फत सादर करावेत. अर्ज ज्या लिफाफ्या मधून सादर करण्यात येतील त्या लिफाफ्यावर "कंत्राटी तत्वावरील लिपिक-टंकलेखक पदासाठी अर्ज" असे ठळकपणे नमूद करणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज स्वीकारार्ह ठरणार नाहीत. तसेच दि.३०/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वा. नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** उमेदवारांनी अर्जावर त्यांचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे तसेच अर्जात त्यांचे संपूर्ण नाव, रहिवासी पत्ता, मोबाईल किंवा दुरध्वनी क्रमांक,अन्य मोबाईल क्रमांक, जन्म दिनांक, शैक्षणिक अर्हता इ. तपशील नमूद करून अर्ज स्वस्वाक्षरीसह सादर करावा. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, ओळख, वय इत्यादी माहिती दर्शविणाऱ्या योग्यत्या प्रमाणपत्राच्या स्वयं साक्षांकित प्रतीं जोडाव्यात.

५) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना चाळणी परिक्षा /मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तथापि, चाळणी परिक्षा /मुलाखतीकरिता येण्या-जाण्याचा कोणताही खर्च कार्यालयामार्फत दिला जाणार नाही.

६) सदर कंत्राटी नियुक्ती महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम,१९७१ च्या कलम १३ अंतर्गत करण्यात येणार असून निवड प्रक्रीये संदर्भातील सर्व अधिकार मा. लोक आयुक्त यांच्या कडे निहित असतील.

**हुकूमावरून**

# लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालयातील कंत्राटी तत्वावरील लिपिक टंकलेखक पादासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना.

येथे उमेदवाराने स्वत:चे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे

प्रति,
मा. प्रबंधक.
लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालया समोर, मुंबई-४०००३२

**विषय: कंत्राटी तत्वावरील लिपिक टंकलेखक पदासाठी अर्ज**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | मराठी | |
| | | इंग्रजी | |
| २ | जन्म तारीख | | D D M M Y Y Y Y |
| ३ | मोबाईल क्रमांक | | |
| | संपर्कासाठी अन्य क्रमांक | | |
| ४ | आधार क्रमांक | | |
| ५ | पॅन क्रमांक | | |
| ६ | सध्याचा पत्ता | | |
| ७ | कायमचा/गावचा पत्ता | | |
| ८ | शैक्षणिक अर्हता | दहावी | |
| | | बारावी | |
| | | पदवी | |
| | | पदव्युत्तर | |
| | | अन्य | |
| ९ | टंकलेखन अर्हता | मराठी | |
| | | इंग्रजी | |
| १० | संगणक अर्हता | | |
| | | | |
| ११ | ज्ञात असलेल्या भाषा | | |
| १२ | अनुभव | | |
| | | | |
| | | | |
| दिनांक : | | | |
| ठिकाण : | | | उमेदवाराची स्वाक्षरी |

{अनु. क्र.२,४,५,८,९,१० व १२ येथील माहितीच्या समर्थनार्थ आवश्यक ती स्वसाक्षांकित कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.}